# गुरुवार

सदा प्रार्थितों श्रीगुरुच्या पदांसी। धरीतों शिरी वंदितों आदरेसीं। धरूनी करीं तारि या बालकासी। नमस्कार हा स्वामि दत्तात्रेयासी।।1।। मतीहीन मी दीन आहे खरा हो। परि मी तुझा दास कृपा करा हो। जसें लेकरूं पाळिते माय कूर्शी। नमस्कार हा. ।।2।। लडीवाळ मी बाळ अज्ञान तूझा। गुरूवांचुनी पांग फेडील माझा। तुझ्यावीण दूजा कोण आहे अम्हांसी। नमस्कार हा. ।।3।। पिता माय बंधू सखा तूं चि देवा। मुलें मित्र सारे सोयरे व्यर्थ हेवा। कळोनि असे भ्रांति होई आम्हांसी। नमस्कार हा.।।4।। चरित्रें गुरूचीं करी नित्य पाठ।

जया भक्ति लागे पदीं एकनिष्ठ। तयाचे कुळीं दीप सज्ञानराशी। नमस्कार हा. । ।5 । । वसे उंबरासन्निध सर्वकाळ। जनीं काननीं धालवी नित्यकाळ। तया सद्‌गुरूचें नाम कल्याणराशी। नमस्कार हा. । ।6 । । श्रमोनी गुरूपाशि तो म्लेच्छ आला। तया स्फोटरो गांतुनी मुक्त केला। कृपेनें तसें स्वामि पाळी अम्हांसी। नमस्कार हा. । ।7 । । सती अनसूया सुधी आदिमाता। त्रयी-मूर्ति ध्यानीं मनीं नित्य गाता। हरे रोग पीड़ा दरिद्रासि नाशी। नमस्कार हा. । ।8 । । करोनी मनीं निश्चयो अष्टकाचा। करा हो जनीं पाठ दत्तात्रेयाचा। करी माधवाच्या सुता दास दासीं। नमस्कार हा. । ।9 । ।